पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक ०७/१०/२०१७ (शनिवार )
(सकाळ)

## जिवानीशी ठार मारण्याचा प्रयत्न करणारा आरोपी अटक

**पो.स्टे. खापरखेडा :** - अंतर्गत ०७ कि.मी. अंतरावर रिजनल स्टोर्स पिपळा कोळसा खदान वलनी शिवार येथे दिनांक ०६/१०/२०१७ चे ००.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे- राजु अरूण डोईफोडे, वय ३५ वर्ष, रा. मिलन चौक, चनकापुर, खापरखेडा हे आपले सोबतचे कर्मचारी सोबत कोळसा खदान, वलनी शिवार येथे पेट्रोलिंग करीत असतांनी आरोपी नामे-१) अर्जुन उर्फ मुन्ना मोनु सिंगोटिया, वय २१ वर्ष, रा. वार्ड नं. ६ वलनी, खापरखेडा हा आपल्या ३ आरोपी मित्रा सोबत संगनमत करुन लोखंड चोरी करीत असतांना यातील फिर्यादीने रोखले असता आरोपी क्रं. १ यांनी आपल्या हातातील धारदार तलवाराने फिर्यादीला जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला व बाकी आरोपी पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे कलम ३०७, ३७९, ३४ भादवि. अन्वये गुन्हा नोंद केला असुन आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. अशोक साखरकर हे करीत आहे

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा :-** अंतर्गत अर्धा किमी अंतरावर क्रशर हाउस पटांगण खापरखेडा येथे दिनांक २८/०९/२०१७ चे २०.०० वा. ते दिनांक ०६/१०/२०१७ चे १०.०० वा.दरम्यान आरोपी नामे- प्रफुल केशवराव बेले, वय २८ वर्ष, रा. नविन नांदा याने फिर्यादी नामे- ओमप्रकाश ताराचंद कापसे, वय ४० वर्ष, रा. प्रकाशनगार खापरखेडा याचे कंपनीचे यंत्र दुरूस्तीचे कामा दरम्यान वब्लर फिटरचे मशीन मधील स्प्रकर २९ नग व चैन टेंशनीग शॉफ्ट २ नग व चैन स्प्रोकेट चे ३ नग असा एकूण कि. ५६०००/- रूपयचा मुद्देमाल इमारतीच्या आवारातुन चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खपरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे हे करीत आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर